राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांकरिता लागू असलेल्या समान लेखा संहितेत (Common Account Code) सुधारणा करण्याकरिता समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय :- परिनि-२०१८/प्र.क्र.१२१/विशि-२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः-१० जून, २०१९.

वाचाः- शासन निर्णय, क्रमांकः- युएसजी २००९/(१६५/०९)/विशि-२, दि.२७.०३.२०१२

प्रस्तावना :-

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांसाठी दि.१.०४.२०१२ पासून समान लेखा संहिता (Common Account Code) लागू करण्यास संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात आली असून दि.१.०४.२०१२ पासून सदर लेखा संहिता राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना लागू करण्यात आली आहे. सदर लेखासंहितेनुसार सर्व विद्यापीठांच्या वित्तीय बाबींवर नियंत्रण ठेवण्यात येते. शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची सुधारीत नियमपुस्तिका (शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१ डिसेंबर, २०१६), GeM पोर्टलचा वापर करण्याबाबतचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/ उद्योग-४, दि.२४ ऑगस्ट, २०१७ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामधील तरतूदींनुसार, महाराष्ट्र विद्यापीठ लेखासंहितेत काळानुरुप आवश्यक सुधारणा करणे आवश्यक ठरते. तद्नुषंगाने सदर लेखासंहिता सुधारीत करण्याकरिता एक समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी सदर लेखा संहितेत आवश्यक ते बदल करण्याकरिता वित्तविषयक ज्ञान/प्रदीर्घ अनुभव असलेल्या तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या एका समितीचे गठन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे खालील व्यक्तींचा समावेश असलेल्या समितीचे गठन करण्यात येत आहेः-

१)	श्री. अनिल राव, सेवानिवृत्त प्राचार्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव	अध्यक्ष
२)	श्री. ज. र. मेनन, संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
३)	डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	सदस्य

४)	डॉ. बी. डी. कऱ्हाड, वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती	सदस्य
५)	श्री. प्रकाश पागे, सनदी लेखापाल, मुंबई	सदस्य
६)	श्री. पराग पाटील, लेखाधिकारी, सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालय, पुणे	सदस्य
७)	संचालक, उच्च शिक्षण, पुणे - समन्वयक	सदस्य

उपरोक्त समितीने आवश्यकतेनुसार लेखा संहिता सुधारणेसंदर्भातील आपला अहवाल १ महिन्यात शासनास सादर करावा.

उपरोक्त समितीने आपल्या बैठका समिती सदस्यांच्या सोयीनुसार अकृषी विद्यापीठांत घेण्यात याव्यात. याबाबतची सूचना संबंधीत विद्यापीठास किमान ८ दिवसांपूर्वी देण्यात यावी.

समिती मधील सदस्यांचे आवश्यक ते मानधन व अनुज्ञेय भत्ते त्या-त्या विद्यापीठांकडून तात्काळ अदा करण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१०१३१२५४४२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH KHARAT

Digitally signed by SIDDHARTH KHARAT
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=22c1b7c1413e77554a8e64cbc60b74fb6471605c32acf8b9b51b2b018fefdc0b, ou=H AND TED, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=SIDDHARTH KHARAT
Date: 2019.06.10 13:19:46 +05'30'

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (उ.व.तं.शि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री (उ.व.तं.शि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) सर्व कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे.

३) सर्व संबंधित समिती पदाधिकारी (टपालाने)

४) मा. सचिव (उ.व.तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

५) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

६) सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) सह/उप सचिव (विशि/मशि/तांशि/साशि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

८) निवडनस्ती.